|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

**विद्यार्थी विकास विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/14/दिव्यांगकलामहोत्सव/43/2020 दि.14/02/2020

## दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव 2019-20

प्रति,
**मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख / नियंत्रक अधिकारी**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांना -**

**विषय :- विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव 2019-20 बाबत....**

महोदय / महोदया,

विद्यापीठ प्राधिकरण धोरणानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिगत सुप्त कला गुणांचा विकास व्हावा आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रतिभावंत-कलावंत घडावेत **विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांना सांस्कृतिक मूल्यांची जाण व्हावी असा मनोदय माननिय कुलगुरु महोदय प्रा. पी. पी. पाटील यांचा असतो;** यासाठी प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळण्याकरीता या शैक्षणिक वर्षापासून पहिल्या विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सवाचे आयोजन **दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र व विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे** यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार **दि.26 फेब्रुवारी, 2020** रोजी करण्यात येत आहे.

विद्यापीठस्तरीय **दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सवात** नृत्य, गीत गायन, वक्तृत्व, काव्यवाचन, निबंध लेखन व चित्रकला इत्यादि कला प्रकारांचा समावेश असेल. आपल्या कडील दिव्यांग विद्यार्थ्यांना या महोत्सवात सहभागासाठी प्रेरित करावे. सहभागी होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थी संघासोबत गरजेनुसार मदतनीस यांना पाठवावे. आयोजक स्थळी सहभागी व मदतनीस यांची भोजन व्यवस्था निशुल्क करण्यात आलेली आहे. सहभागी होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थी व मदतनीस यांची माहिती vwscollege.dhule@rediffmail.com या ईमेलवर दि.22 फेब्रुवारी, 2020 पावेतो पाठवावी व hard copy महोत्सवाच्या दिवशी सकाळी 9.00 वाजेपर्यंत आयोजन स्थळी नोंदणी कक्षात सादर करावी.

**आयोजक महाविद्यालय संपर्कः-**
प्रा. बी. डी. गणपाटील - भ्र. क्र. 9421538763
डॉ. एस. जी. गोल्डे - भ्र. क्र. 9834859457
डॉ. सी. एस. वाणी - भ्र. क्र. 9767160689

आपला विश्वासू,

(डॉ. पंकजकुमार नन्नवरे)
**प्र.संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत :-** सोबत महोत्सवाच्या अटी, शर्ती व प्रवेश अर्ज

**प्रत माहितीसाठी -**

1) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
2) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) विभागप्रमुख, कुलसचिव, कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
4) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
5) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया वृत्तपत्रात प्रसिध्दी दयावी.
6) मा.पध्दती विश्लेषक संगणक केंद्र, संगणक प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया पत्रकास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.

***D:\\VBOXSVR\xp_data\Diyang Kala Mahotsav 2019-20 Paripatrak.docx***

☎ : (९१) ०२५७-२२५७४१८, ४१९ वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७-२२५७४०३, ४०६ ई-मेल : sw@nmu.ac.in

## ♦ विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव 2019-20 नियमावली ♦

*** महाविद्यालय, परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना महत्वाच्या सूचना :-**

1) सहभागी दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी करतांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
2) प्रत्येक महाविद्यालयाच्या संघासोबत आवश्यकतेनुसार मदतनीस पाठविणे. त्यांचा प्रवासखर्च त्या-त्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था / प्रशाळा-विभाग यांनी करावा.
3) कोणत्याही कला प्रकारासाठी वादन साहित्य, इतर साहित्य, स्पर्धकास आयोजकांमार्फत पुरविण्यासाठी ईमेलद्वारे पूर्व सूचना देण्यात यावी.
4) महोत्सवात सहभागी होणाऱ्या संघाची कला प्रकार निहाय नोंदणी परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे करावी. उशिरा आलेल्या संघाची नोंदणी करण्यात येणार नाही, याची संघ व्यवस्थापकांनी नोंद घ्यावी.
5) महोत्सवासाठी दिव्यांग विद्यार्थी / विद्यार्थीनीची निवड करतांना सदरचा विद्यार्थी पदवी / पदवीव्युत्तर वर्गात नियमित प्रवेश घेणारा असावा. त्यांचेकडे शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील ओळखपत्र असावे त्यावर मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ ग्रंथपाल याची स्वाक्षरी असावी.
6) प्रत्येक संघाने निश्चित केलेल्या क्रमवारीनुसार सादरीकरण करणे बंधनकारक राहील.
7) संघ व्यवस्थापकांच्या सभेत वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे विषय महोत्सवाच्या दिवशी नोंदणीस्थळी देण्यात येतील.
8) **कला प्रकार सादरीकरणामध्ये अश्लिल शब्दाचा वापर करु नये.**
9) दिव्यांग विद्यार्थी व मदतनीस यांना महोत्सवातील प्रवेश निशुल्क राहील. तसेच आवश्यकतेनुसार आयोजकांकडून आदल्या दिवसाची निवास व्यवस्था पूर्व सूचना दिल्यास करण्यात येईल.
10) महाविद्यालयाने महोत्सवात सादर केलेल्या कला प्रकाराची मुळ संहिता वापरण्याविषयी लेखक / कलावंत यांची लेखी संमती घेणे आवश्यक राहील व त्याची प्रमाणित छायांकित प्रत प्रवेशिकेसोबत सादर करणे आणि त्याची एक प्रत संघ व्यवस्थापकाने बाळगणे अनिवार्य राहील.
11) विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सवात सहभागीनां सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.
12) महोत्सव संबंधी कोणताही निर्णय घेण्याचा, कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार महोत्सव समन्वय समितीने राखून ठेवला आहे.

(डॉ. पंकजकुमार नन्नवरे)
**प्र.संचालक, विद्यार्थी विकास**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

---

**पहिले विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव 2019-20**

# प्रवेश अर्ज

1. विद्यार्थी / विद्यार्थीनीचे नांव :- ____________________
2. वर्ग :- ____________________
3. जन्म तारीख :- ____________________
4. भ्रमणध्वनी क्रमांक :- ____________________
5. ईमेल आयडी :- ____________________
6. महाविद्यालयाचे नांव :- ____________________
   ____________________
7. खालीलपैकी कोणकोणत्या कला प्रकारात सहभागी व्हायचे आहे, त्यानुसार चौकोनात √ खूण करावी.

   नृत्य ☐ गीतगायन ☐ चित्रकला ☐

   निबंध लेखन ☐ वक्तृत्व ☐ काव्यवाचन ☐

8. आपण इतर ठिकाणी कला महोत्सवात सहभागी झाला आहात काय ? (महत्वाचे किमान पाच)
   1.____________________ 2.____________________
   3.____________________ 4.____________________
   5.____________________
9. मी ____________________ वर्ग __________ प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, सदर कला महोत्सवात मी ज्या कला प्रकारात सहभाग घेतला आहे, त्या साहित्याची निर्मीती माझी स्वत:ची असून इतर कोणाचेही वाङमय चौर्य नाही याची मला खात्री आहे. यासंबधी खोटा प्रकार आढळल्यास मी स्वत: जबाबदार राहील.

आपला / आपली विश्वासू,

(विद्यार्थी / विद्यार्थीनीची स्वाक्षरी)

प्राचार्य
सही व शिक्का

*D:\\VBOXSVR\xp_data\Divang Kala Mahotsav 2019-20 Paripatrak.docx*